CMYK

अनेक कार्यकर्त्यांचा पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश >> पान 2

महापुरुषांचे विचार आचरणात आणले तरच जयंती पुण्यतिथी सार्थकी लागतील - जाधव >> पान 3

गांधीनगर येथे दोन दिवसीय होमिओपॅथिक अधिवेशनाचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले उद्घाटन >> पान 4

**सुविचार**

सकारात्मक विचारच यशाची गुरुकिल्ली आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 239 ■ शनिवार, दि. 12 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'एक दिवस उपाशी राहीन, पण सेक्स'; समंथाचं उत्तर ऐकून सगळे शॉक

आतील पान

## लवकरच शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करण्याचा निर्णय; मंत्री भुसेंची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील जिल्हा परिषद शाळांची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली आहे. या शाळांची सुधारणा लवकरात लवकर करण्याबाबत शिक्षण विभागाच्या स्तरावरुन प्रयत्न करुन पुढील वर्षभरात जिल्हा परिषदेच्या शाळांची सुधारणा झाल्याचे पाहायला मिळेल असे आश्र्वासन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले आहे. मंत्री दादा भुसे हे आज धुळे दौऱ्यावर आले असताना त्यांच्या उपस्थितीत शिक्षण विभागाची बैठक पार पडली. या बैठकीत दादा भुसे यांनी जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या कार्याचा आढावा जाणून पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबाबत शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षकांची अशैक्षणिक कामे लवकरच कमी करण्याचा निर्णय शिक्षण विभागाच्यावतीने घेण्यात येईल असेही भुसे म्हणाले.

विद्यार्थ्यांना शिक्षण विभागामार्फत देण्यात घेणारे गणवेश हे लवकरात लवकर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जातील. यंदा १५ जूनला शाळा उघडल्यावर विद्यार्थी गणवेशात आलेले दिसतील अशी माहिती दादा भुसे यांनी दिली.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले दाखवणारी विशेष रेल्वे सुरु करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि आसपासची महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे दाखवणारी विशेष रेल्वे लवकरच सुरू होणार आहे. या संदर्भातील माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. ज्यामध्ये सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे सुरू होईल. यामार्फत दहा दिवसांची टूर केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, जागा, त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळांना या रेल्वेद्वारे भेट देणे शक्य होणार आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## ...तर मुलींनी बापाचा खून करावा, अभिनेत्री अलका कुबल कडाडल्या



**मुंबई/प्रतिनिधी :** बाप जर मुलींवर बलात्कार करत असेल, तर मुलींनी अशा बापाचा खूनच करावा, असं खळबळजनक वक्तव्य अभिनेत्री अलका कुबल यांनी केलं आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आपल्या देशातही आखाती देशांप्रमाणे कठोर कायदे असायला हवेत, असं आवाहनही अलका कुबल यांनी केलं आहे. दरम्यान, जळगावमध्ये झालेल्या खान्देश करिअर महोत्सवाच्या निमित्तानं अभिनेत्री अलका कुबल जळगावमध्ये उपस्थित होत्या, त्यावेळी अनेक सामाजिक आणि कौटुंबिक विषयांना स्पर्श करणारी मुलाखत त्यांनी माध्यमांना दिली. खान्देश करिअर महोत्सवासाठी अभिनेत्री अलका कुबल यांनी हजेरी लावली होती. या महोत्सवासाठी अभिनेत्री अलका कुबल उपस्थित होत्या. त्यावेळी त्या म्हणाल्या की, महिलांवर अत्याचार रोखायचं असतील तर आखाती देशांप्रमाणे कठोर कायदे असायला हवे, त्यात एखादा बापच जर मुलीवर अत्याचार करत असेल तर मुलींनी अशा बापाचा खूनच करायला हवा, अशी उद्विग्न होत संतापजनक प्रतिक्रिया अभिनेत्री अलका कुबल यांनी जळगावमध्ये दिली आहे.


### अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत

# महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा कायापालट

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी मुंबई येथे दिली. लातूर रेल्वे स्थानकाचाही यामध्ये समावेश असून यासाठी १९ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

## रेल्वे मंत्री अश्वीनी वैष्णव यांची माहिती



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झालेल्या या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्राच्या रेल्वे पायाभूत सुविधेत होत असलेल्या दर्जेदार सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री.वैष्णव यांचे आभार मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्र्चिम), अंधेरी, लोहमार्ग टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, संगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे, जसे की – अकलकोट रोड, दौंड, इगतपुरी, चांदा फोर्ट, माळाड, डोंबिवली, चिंचवड, इत्यादीचा समोवश आहे.

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

>> पान २

## समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात पिता-पूत्र ठार

**वाशीम येथील चंदनशिव परिवारावर काळाचा झाला**

--------

**जून महिन्यात होते पूजाचे लग्न**

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** देवदर्शन करून परत येत असताना चंदनशीव परिवारावर काळाने घाला घातल्याने पितापूत्र जागीच ठार झाले. तर,तीन जण जखमी झाले. मन सुन्न करणारी घटना ११ एप्रिल रोजी सकाळी ३ वाजताच्यादरम्यान समृद्धी महामार्गावरील डोणगाव गावाजवळ घडली. सदर घटनेत रतन पाटील चंदनशीव (वय ५५)व गोपाल चंदनशीव (वय ३५) असे मृतक पितापुत्राची नावे आहेत. प्राप्त माहितीनुसार वाशीम शहरातील माधवनगर लाखाळा परिसरात वास्तव्यास असलेलेले रतन चंदनशिव व गोपाल चंदनशीव हे पित्रापुत्र परिवारासह एम.एच.११ सीक्यू ८५६६ क्रमांकाच्या कारने देवशदर्शनासाठी गेले होते. देवदर्शन घेऊन समृद्धी महामार्गाने परत येत असातना एक तासाच्या अंतरावर घर असताना डोगणाव जवळ समृद्धी महामार्ग चॅनल क्रमांक २६८ जवळकाळाने त्यांच्यावर घाला घातला. समोरच्या आर.जे. २९ जी.बी.२८२० क्रमांकाच्या ट्रकला कारचालकाने जबर धडक दिली.या अपघातात रतन चंदनशिव व गोपाल चंदनशीव हे पितापूत्र जागीच ठार झाले तर,चंदनशीव परिवारातील नववधू पूजा रतन चंदनशिव (वय २९), राणी गोपाल चंदनशिव (वय ३१) अर्चना रतन चंदनशिव (वय ५० ) व चालक शिवाजी इडोळे गंभीर जखमी झाले. गंभीर जखमींना छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी पाठविण्यात आले.या वेळी महामार्ग पोलीस व डोणगाव पोलिसांनी घटनास्थळी पोचून जखमींना तात्काळ अँम्ब्युलन्स द्वारे रेफर केले व क्रेनद्वारे वाहन उचलून वाहतूक सुरळीत केली.या वेळी पोलीस कर्मचारी व क्विक रिस्पॉन्स टीमचे सदस्य उपस्थित होते.




### जून महिन्यात होते पूजाचे लग्न

चंदनशीव परिवाराच्या घरी गंभीर जखमी झालेल्या पूजाचे जून महिन्यात लग्न होत. त्यामुळे सर्व आनंदआनंदी वातावरण होते. लग्नाची तयारीही सुरू होती. अशातच नवरी होणाऱ्या पूजाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी रतन पाटील चंदनशीव हे सह परिवारासह देवदर्शनाला गेले होते. देवदर्शन घेऊन परत येताच लग्नसोहळयाची तयारी करायची... असे ठरवून घरी निघालेल्या चंदनशीव परिवारावर व सुखी संसाराचे स्वप्न पाहत असताना होणाया नववधूवर काळाने घाला घातला. समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात नववधू पूजा गंभीर जखमी झाली. तर, तिचे वडील व भावाचा जागीच मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.शोकाकूळ वातावरणात त्यांच्यावर वाशीम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शिवरायांचा अवमान करणारा प्रशांत कोरटकर कळंबा तुरुंगाबाहेर, पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरला जाणार

कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान करणारा तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणारा प्रशांत कोरटकर आता तुरुंगाबाहेर आला आहे. दोन दिवसांपूर्वी कोल्हापूर सत्र >> पान २




## गोठ्याला आग लागून शेतकऱ्याचे अडीच लाखाचे नुकसान

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव येथील मागणी रोडवर स्थित शेत सर्व्हे नंबर ८४१४ मधील शेतकरी बशीर बेग,मजीद बेग व अफसर बेग यांच्या गोठ्याला आग लागून त्यातील शेती उपयोगी साहित्य अंदाजे किंमत २ लाख ३५ हजार रुपये जळून खाक झाल्याची घटना १० एप्रिलच्या रात्री ११ : ३० दरम्यान घडली.

डोणगाव पासून जवळच असलेल्या मादणी रोडवर शेतसर्व्हे नंबर ८४१४ मधील बशीर बेग, मजीद बेग व अफसर बेग यांचे शेत असून या शेतात असलेल्या गोठ्यात शेती उपयोगी साहित्य ठेवण्यात आलेले होते ज्याला १० एप्रिलच्या रात्री अचानकपणे आग लागली ज्यात २० फूट लांब २५ फूट रुंद अशी लोखंडी कॅबिन,ट्रॅक्टरवर चालणारे फवारणी यंत्र,जैन रेन हार्वेस्टिंग नळी १ हजार फूट,सोयाबीन टोकन पेरणी यंत्र,ड्रीप व फिल्टर २ नग,पेट्रोल पंप, बैलगाडी पाळणा, सेक्शन पाईप ६० फूट हे दोन लाखाचे साहित्य तर अफसर बेग यांच्या शेतातील गोठ्या वरील पत्रे उडाल्याने त्यांनी त्यांच्या गोठ्यातील साहित्य हे बशीर बेग यांच्या गोठ्यात ठेवलेले होते ज्यात पेट्रोल पंप,लाकडी तिफन,डी ए पी खत अडीच बॅग,स्पिनकलर तोट्या ८ नग,लोखंडी डवरे २,लाकडी डवरे २,माजाळे, शिवराळे असे ३५ हजाराचे साहित्य जळून खाक झाले आग कशी लागली याचे कारण समजू शकले नाही या प्रकरणी तलाठी अनुप नरोटे यांनी पंचनामा केला.




# ओटीएस स्कीम शेतकऱ्यांसाठी आणू

## कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** निर्णय झाले नाही बँकेचे कर्मचारी शेतकरी प्रशासक सहकार विभागाचे सचिव यांनी चर्चा केली. यातून आपल्याला मार्ग काढता येईल बँक सुरळीत करता येईल.कायदेशीर वसुली स्थगिती दिली पाहिजे, पण मी सुचवले आहे. पुढेच तीन महिने वसुली थांबवली पाहिजे. जे पैसे भरू शकत आहेत. त्यांनी भरले पाहजे, वेगवेगळ्या योजना आम्ही आणणार आहोत. नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेचा नियम आहेत.

ओटीएस स्कीम शेतकऱ्यांसाठी आणू, आम्ही सर्व साधक बाधक चर्चा केली आहे जे जे शक्य आहे ते करण्याचा आमचा निर्णय झाला आहे. अशी माहिती कृषिमंत्री कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. बँक अडचणीत आली आहे.त्या बँकेत शिक्षण खाते महिला बालकल्याण आणि शासकीय निधी बँकेमध्ये येत होता, तो बँकेत येण्याऐवजी खाते डायव्हर्ट करण्यात आले आहेत.



आम्ही डिपॉझिट पण देणार आहोत. आमची कोणाचीही जिल्हा बँकेकडे थकबाकी नाही. माझी तर नाहीच पण ९९ टक्के संचालकांची थकबाकी नाही. सहकारी संस्था कारखाने एक भुजबळांचा कारखाना त्यांच्या फायनान्स केले होते त्यांनी पैसे भरले. अद्वय हिरे यांचा कोर्टात मॅटर आहे.

जे कर्ज येणे आहे ते संचालकांचे नाही लोकांचा गैरसमज आहे. सहकार मंत्री सुनावणी या संदर्भात मी बोलणे बरोबर नाही. न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. सहकार मंत्री यांच्याकडे अधिकारी आहे. त्यांच्याकडे अपिल दाखला आहे. नियम आणि कायदेशीर बाजू आम्ही त्यांच्यासमोर मांडू. जिल्हा बँक थकबाकीदार वसुलीबाबत मी बोलणे बरोबर नाही, न्यायालयीन प्रक्रिया आहे. जे बेड थकबाकीदार आहेत फक्त ११ टक्के आहे , वसुली सुरूच राहील. नवीन ओटीएस स्कीम राबवण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना कर्ज भरणे सुलभा व्हावे यासाठी स्कीम आहे.व्हाईट रक्कम भरणारे कोणी पुढे येणार नाही. इन्व्हेसमेंट वाया जाणारा नाही बँक व्यवहार सुरळीत झाले तर, बँक विकण्याचा प्रश्न येत नाही. बँक जिवंत राहणार आहे, सुरळीत राहणार आहे. याचा विश्वास राहावा म्हणून आम्ही प्रयत्न करत आहोत. एकाच इमारतीमध्ये काम होत आहे. जिल्हा बँकेचे कर्जदार शेतकरी नाही तर सोसायट्या आहेत. राज्यसरकार लागेल तो निधी बँकेला देण्यासाठी तयार आहे.बच्चू कडू आंदोलन करीत आहेत. तो त्यांचा अधिकार आहे. त्यांनी कसे आंदोलन करावे.त्यांना लोकशाही मार्गाने आंदोलन करणे अधिकार आहे.त्यांनी मला सांगितले तर मी त्यांना भेटेन.१७ तारखेला शेतकरी संघटनासोबत माझी बैठक आहे.पारदर्शक पने कारभार चालला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे असे मत कृषी मत्री कोकाटे यांनी यावेळी व्यक्त केले.

CMYK

## महिलांचे उध्दारकर्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर

सोमवार १४ एप्रिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वि जयंती आहे. १४ एप्रिल १८९१ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

# अनेक कार्यकर्त्यांचा पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## माजी मंत्र्यांच्या गडात सुरुंग !




**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी :** लोणार तालुक्यातील बिबी किनगाव जट्टू जिल्हा परिषद सर्कलमधील माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांच्या विश्वास कार्यकर्त्यांनी सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार मनोज कांयदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बुलढाणा येथील विश्रामगृहामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री व राष्ट्रवादी नेते मकरंद आबा पाटील यांच्या उपस्थितीमध्ये दिनांक ८ एप्रिल रोजी राष्ट्रवादी (अजित पवार) गटामध्ये प्रवेश केला यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. संचालक अंबादास खंड पाटील, शंकर चव्हाण, हत्ता येथील माजी सरपंच दिनकर चव्हाण तर काँग्रेसचे माजी सभापती सुनिल केंद्रे वअखिल भारतीय वडार सेनेचे जि.उपाध्यक्ष विजयजी काळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी हातामध्ये घडी बांधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी जिल्हा अध्यक्ष नाझेर काझी ,प्रदेश सरचिटणीस नितीन कायंदे , ज्येष्ठ नेते विठ्ठल पाटील आटोळे, प्राध्यापक अरविंद चव्हाण,सह असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते शरद पवार गटाल लागलेली गळती थांबणार की याची व्याप्ती वाढणार...

# रताळी येथील ई-क्लास जमिनीवरील अतिक्रमणाबाबत आयोगाची दखल

## अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांची रताळी गावाला भेट व पाहणी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सिंदखेड राजा तालुक्यातील रताळी येथील पंचफुलाबाई भिमराव जाधव व इतरांनी शासनाच्या ई-क्लास जमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची आयोगाने दखल घेतली असून, आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी आज रताळी गावाला भेट देऊन पाहणी केली.

या प्रकरणी तक्रारकर्त्यांनी संबंधित जमिनीत अतिक्रमण नियमाप्रमाणे केल्याचे नमूद केले आहे. सदर जागेवर सौर कृषी वाहिनी प्रकल्प प्रस्तावित असून काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाच्या जागेवर अतिक्रमण केल्यामुळे स्थानिकांनी पर्यायी व्यवस्था करून देण्याची मागणी केली आहे.

श्री. मेश्राम यांनी तक्रारकर्त्यांचे



म्हणणे ऐकून घेतले. यासंदर्भात प्रशासनाला सूचना देण्यात आल्या की, संबंधित कागदपत्रांची नियमाप्रमाणे तपासणी करून अतिक्रमणाच्या जागेबाबत तातडीने अहवाल सादर करावा. तसेच, तक्रारकर्त्यांना पर्यायी जमीन उपलब्ध होऊ शकते का, याचीही चौकशी करावी. तोपर्यंत संबंधित प्रकल्पाचे काम स्थगित ठेवावे, आणि एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, अशा सूचना उपाध्यक्षांनी केल्या.

या वेळी अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी, तहसीलदार अजित दिवटे, सरपंच उषा पाटील, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक

## विविध ठिकाणी मिरवणुकीचे जंगी स्वागत

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** स्थानिक महात्मा फुले मंडळ व महात्मा फुले युवा मंडळ यांच्या वतीने ११ मार्च रोजी दुपारी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संपूर्ण प्रभात फेरी मार्गाने जय ज्योती जय क्रांति च्या जयघोष करीत संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली.यावेळी ठिकठिकाणी महात्मा फुले यांच्या मिरवणूकीची पूजन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले मंडळाचे पदाधिकारी व गावकरी यांनी सहभाग घेतला होता. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त आयोजित भव्य मिरवणूक परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. शहरातील प्रमुख मार्गावरून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.त्याचबरोबर अनेक ठिकाणी रॅलीमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांना शितल पेय व अल्पवहाराची व्यवस्था करण्यात आली होती.क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सकाळपासूनच नागरिकांनी हजेरी लावत महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन केले.

### डोणगाव येथे ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

डोणगाव येथे महात्मा फुले मित्र मंडळाच्या वतीने स्थानिक महात्मा फुले पुतळ्याजवळ ११ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सर्व प्रथम मान्यवरांच्या व महात्मा फुले मंडळाच्या सदस्य यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले व त्यानंतर रक्तदान शिबीर सुरू झाले. यावेळी वाशीम येथील कांतादेवी डहाळे ब्लड बॅक चे डॉ. माने व त्यांचे सहकारी यांनी रक्तदान करून घेतले. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले हे रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी महात्मा फुले मंडळ व महात्मा फुले युवा मंडळ तसेच समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

पान १ वरून...

### अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत

या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे. अजनी स्टेशन (२९७.८ कोटी), नागपूर जं. (५८९ कोटी), नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी जं. (१७.४ कोटी), जालना (१८९ कोटी), संभाजीनगर (२४१ कोटी), रोटेगाव (१२ कोटी), अहिल्यानगर (३१ कोटी), भायकुला (३५.५ कोटी), चिंचपोकळी (५२ कोटी), चर्नी रोड (२३ कोटी), छत्रपती शिवाजी महाराज टमिनल (१८१३ कोटी), ग्रॅट रोड (२७ कोटी), लोवर परेल (३० कोटी), मरिन लाईन्स (२७.७ कोटी), सण्डहर्स्ट रोड (१६.४ कोटी), मुर्तिजापूर स्टेशन (१३ कोटी), बडनेरा (३६.३ कोटी), बारामती (११.४ कोटी), दौंड (४४ कोटी), केडगाव (१२.५ कोटी), परळी वैजनाथ (२५.७ कोटी), भंडारा रोड (७.७ कोटी), गोंदिया ४० कोटी), तुमसर रोड (११ कोटी), टिटवाळा (२५ कोटी), शेगाव (२९ कोटी), बल्लारशाह (३१.४ कोटी), चंद्रपूर (२५.५ कोटी), चांदा फोर्ट (१९.३ कोटी), धुळे (९.५ कोटी), लासलगाव (१०.५ कोटी), मनमाड (४५ कोटी), नगरसोल (२०.३ कोटी), नांदगाव (२० कोटी), आमगाव (७.८ कोटी), वडसा (२०.५ कोटी), हातकंनगले (६ कोटी), हिमायतनगर (४३ कोटी), हिंगोली डेक्कन (२१.५ कोटी), किनवट (२३ कोटी), चाळीसगाव (३५ कोटी), अंमळनेर (२९ कोटी), धरणगाव (२६ कोटी), पाचोरा जं. (२८ कोटी), दिवा (४५ कोटी), मुंब्रा (१५ कोटी), शहाड (८.४ कोटी), कोल्हापूर - छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (४३ कोटी), लातूर (१९ कोटी), जेऊर (२० कोटी), कुर्डूवाडी जं (२० कोटी), फलटण (१ कोटी), वाठर (८ कोटी), आकुर्डी (३४ कोटी), चिंचवड (२०.४ कोटी), देहू रोड स्टेशन (८.०५ कोटी), तळेगाव स्टेशन (४०.३४ कोटी), मालाड स्टेशन (१२.३२ कोटी), कुर्ला जं. स्टेशन (२८.८१ कोटी), कांजुरमार्ग स्टेशन (२७ कोटी), विद्याविहार स्टेशन (३२.८ कोटी), विक्रोळी स्टेशन (१९ कोटी), जोगेश्र्वरी स्टेशन (११९ कोटी), माटुंगा स्टेशन (१७.३ कोटी), परळ स्टेशन (१९.४ कोटी), प्रभादेवी (२१ कोटी), वडाळा स्टेशन (२३ कोटी), भोकर स्टेशन (११.३ कोटी), धर्माबाद स्टेशन (३० कोटी), मुखेड जं.स्टेशन (२३ कोटी), उमरी स्टेशन (८ कोटी), देवळाली स्टेशन (१०.५ कोटी), इगतपुरी स्टेशन (१२.५ कोटी), धाराशिव स्टेशन (२२ कोटी), गंगाखेड स्टेशन (१६ कोटी), मनवथ रोड स्टेशन (१२ कोटी), परभणी जं. स्टेशन (२६ कोटी), परतूर स्टेशन (२३ कोटी), पूर्णा जं. स्टेशन (२४ कोटी), सेलू स्टेशन (२३.२ कोटी), हडपसर स्टेशन (२५ कोटी), गोधनी स्टेशन (२९ कोटी), काटोल स्टेशन (२३.३ कोटी), कामठी स्टेशन (७.७ कोटी), नरखेड जं. स्टेशन (३७.६ कोटी), कराड स्टेशन (१२.५ कोटी), सांगली स्टेशन (२४.२ कोटी), लोणंद जं.स्टेशन (१०.५ कोटी), सातारा स्टेशन (३४.३ कोटी), बेलापूर स्टेशन (३२ कोटी), कोपरगाव स्टेशन (३० कोटी), सेवाग्राम स्टेशन (१८ कोटी), धामणगाव स्टेशन (१८ कोटी), हिंगणघाट स्टेशन (२२ कोटी), पुलगाव स्टेशन (१६.५ कोटी), उरूली स्टेशन (१३ कोटी), वाशिम स्टेशन (२०.३ कोटी), मलकापूर स्टेशन (१९ कोटी), नांदुरा स्टेशन (१०.६ कोटी), रावेर स्टेशन (९.२ कोटी), सावदा स्टेशन (८.५ कोटी), दुधनी स्टेशन (२२ कोटी), पंढरपूर स्टेशन (४० कोटी), सोलापूर स्टेशन (५६ कोटी), नंदूरबार स्टेशन (१५ कोटी) आणि पालघर स्टेशन (१७.५ कोटी).

### शिवरायांचा अवमान करणारा प्रशांत कोरटकर

न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. आता तो कळंबा तुरुंगातून बाहेर आला. कोरटकरला असलेला धोका लक्षात घेता पोलिसांच्या सुरक्षेमध्ये त्याला नागपूरच्या घरी पोहोचवण्यात येणार आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना फोन करून प्रशांत कोरटकरने धमकी दिली होती. त्यावेळी त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरले होते. याच प्रकरणात प्रशांत कोरटकरवर कोल्हापुरात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कोरटकरला सुरुवातीला पाच दिवस पोलिस कोठडी तर नंतर १२ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे.

दोन दिवसांपूर्वी कोरटकरला जामीन मिळाला होता. पण न्यायालयीन प्रक्रिया आणि एका दिवसाची सुट्टी असल्याने कोरटकरचा मुक्काम वाढला होता. आता कोरटकरला तुरुंगाबाहेर काढण्यात आलं आहे.

**पोलिस सुरक्षेत नागपूरपर्यंत पोहोचवणार?**

प्रशांत कोरटकरच्या जीवाला धोका असल्याचा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला होता. कोरटकरला पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरपर्यंत पोहोचवण्यात यावं अशी मागणीही त्यांनी केली होती. न्यायालयाने ती मागणी मंजूर केली. प्रशांत कोरटकरला आता पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरच्या घरी पोहोचवण्यात येणार आहे.

**तुरुंगाबाहेरची स्थिती काय?**

प्रशांत कोरटकरला या आधी न्यायालयात हजर करताना त्याच्यावर हल्ला करण्यात आला होता. ते लक्षात घेतला कळंबा जेलच्या परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

प्रशांत कोरटकर एकूण १७ दिवस कोठडीत होतो. या दरम्यान एक दिवस त्याची पत्नी भेटायला आली होती. कोरटकरला कळंबा जेलच्या अंडा सेलमध्ये ठेवण्यात आलं होतं.

**कोरटकर प्रकरणाचा घटनाक्रम काय?**

२४ फेब्रुवारीच्या मध्यरात्री १२ वाजून ८ मिनिटांनी कोरटकरने इंद्रजित सावंतांना फोन केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करत सावंतांना धमकी दिली होती. इंद्रजित सावंतांचा नंबर त्यानं कोल्हापूर पोलिस दलात कार्यरत असलेल्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडून मिळवल्याची माहिती आहे. २५ फेब्रुवारीला इंद्रजित सावंत यांच्या तक्रारीवरून कोल्हापूरच्या राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कोरटकरनं २७ फेब्रुवारीला एक व्हिडीओ तयार करून माफी मागण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी प्रशांत कोरटकर एक महिन्याहून अधिक काळ फरार होता. कोल्हापूर पोलिसांनी त्याला तेलंगणामधून अटक केली. त्यानंतर कोल्हापूर सत्र न्यायालयाने त्याला आधी पाच दिवसांची पोलिस कोठडी आणि नंतर १० दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर त्याला पुन्हा १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. आता त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महापुरुषांचे विचार आचरणात आणले तरच जयंती पुण्यतिथी सार्थकी लागतील - जाधव




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळ गतिमान केली. त्यांच्या शेतकऱ्यांचा आसूड यासह इतर वाङ्मयीन लेखनामुळे क्रांतिकारी कार्य झाले. सर्व महापुरुषांचे विचार आचरणात आणले तरच जयंती पुण्यतिथी सारखे उत्सव सार्थके लागतील, असे विचार केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.**

महात्मा फुले सत्यशोधक चळवळ आणि समता परिषदेच्या वतीने आज महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी उद्यानात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार संजय रायमुलकर होते. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहरप्रमुख जयचंद बाठीया, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती आशाताई झोरे, युवा सेनेच सेनेचे जिल्हाधक्ष ऋषिकेश जाधव, तालुकाप्रमुख भूषण घोडे, समता परिषदेचे जिल्हा सरचिटणीस अशोक इंगळे, भीमशक्तीचे भाई कैलास सुकदाने, नीरज रायमुलकर, विजय मोरे, नितीन राऊत, रविराज रहाटे, संदीप पांडव, विनोद पव्हाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. रफिक कुरेशी, गजानन पायघन, श्रीकृष्ण जुमडे, अमोल इंगळे, कुडके, शिवाजी इंगळे, मधुकर निकम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आपल्या भाषणात माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, सामाजिक विषमतेचे समतेमध्ये रूपांतर करून समाजाला नवी दिशा देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. महिलांच्या उत्कर्षासाठी सावित्रीबाई फुले यांनी आपले आयुष्य वेचले व एक आदर्श निर्माण केला. महापुरुषांचे महान कार्य आणि विचार अखिल माने मानव जातीला पुढे नेतात,असेही ते म्हणाले. यावेळी सारंग तायडे यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा फुले यांच्या कार्याची महती वर्णन केली. यावेळी विजय फंगाळ यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन राजेश मगर यांनी केले आणि आभार मानले.




## संक्षिप्त...

### कोणतीही मदत केली नसताना कोकणावर बोलायचा अधिकार नाही ; खासदार नारायण राणे यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षाच्या कार्यकाळात सिंधुदुर्ग ला किती पैसा दिला याची आकडेवारी मागावी नाही तर मी देतो. कोणतीही मदत केली नसताना कोकणावर बोलायचा अधिकार नाही अशी टीका खासदार नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी बोलताना खासदार राणे म्हणाले की, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आजची बैठक खेळीमेळीत पार पडली. जिल्ह्यात वेगवेगळ्या योजनांसाठी जो पैसा येतो तो १०० टक्के खर्च व्हावा यादृष्टीने आम्ही अधिकाऱ्यांचा आढावा घेतला. सर्व विकासकामे मार्गी लागावीत आणि वेळेमध्ये पूर्ण व्हावीत, सिंधुदुर्गात होणाऱ्या ड्रग्ज विषयी या बैठकीत पहिल्यांदाच विषय मांडण्यात आला. या जिल्ह्यात पुन्हा ड्रग्ज सापडणार नाही, अशा सूचना पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. प्रस्तावित घोटगे-सोनवडे कोल्हापूर घाटरस्त्यासाठी जे पैसे लागतील ते देणार. आम्ही आहोत पैसे मिळणार आहेत.

उद्धव ठाकरे लोकनाट्य येणार आहेत ना, खालून वरपर्यंत काम करायला! त्यांची त्यांनी सिंधुदुर्गला किती पैसे दिले अडीच वर्षातील आकडेवारी मागवी. नाहीतर मी तुम्हाला देतो. मग कळेल काय अधिकार आहे. कोकणावर बोलायचा आणि यायचा! मी सगळ्या हॉटेलवाल्यांना सांगितले ज्या दिवशी येतील, त्या दिवशी कोंबडी वडे, मासे बंद! चिपी विमानतळावर आता इंडिगो पण येणार, विमानतळ आता कधी बंद नाही. सर्व विमाने येणार. पण लोकांनी प्रवास करावा. असे आवाहन यावेळी खासदार नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलताना केले.

### मोबाईल हिसकावून पळणाऱ्या चोराला मानपाडा पोलिसांनी केली अटक




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** मोबाईल हिसकावून पळणाऱ्या चोराला मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. हंजला खान असे या आरोपीचे नाव आहे. तो कल्याण पश्चिमेतील गोविंदवाडी परिसरात राहणारा आहे. हंजला याच्या विरोधात यापूर्वी सहा मोबाईल चोरी आणि एक हत्येचा गुन्हा दाखल आहे. डोंबिवली पूर्वेतील मिलापनगर परिसरात काही दिवसांपूर्वी ओमकार पवार नावाचा तरुण त्याच्या मित्रांसोबत पायी चालत जात असताना स्कूटीवरुन हेल्मेट घातलेला तरुण त्याच्या बाजूला आला. त्यावेळी ओमकार पवार कोणाशी तरी मोबाईलवर बोलत होता. याचवेळी चोरट्याने त्याच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढला. ओमकार आणि त्याच्या मित्राने चोरट्याचा पाठलाग केला. तोपर्यंत चोरटा पसार झाला होता. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी महेश राळेभात आणि संपत फडोल यांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला. सीसीटीव्हीच्या सहाय्याने पोलिस चोरट्याच्या घरी पोहचले. हंजला खान असे या चोरट्याचे नाव आहे. तो कल्याण पश्चिमेतील गोविंदवाडीत राहणारा आहे. त्याच्या विरोधात यापूर्वी मोबाईल चोरीचे सहा गुन्हे आणि एक हत्येचा गुन्हा आहे. त्याने दोन वर्षापूर्वी एका ट्रक चालकाची हत्या केली होती. हंजला खानच्या पोलिस चौकशीत आणखीन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

### कल्याणमध्ये शिक्षकाची सोन्याच्या गुंतवणुकीतून ६६ लाखाची फसवणूक

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पूर्वेतील लोकधारा सह्याद्री भागात राहत असलेल्या एका ५४ वर्षाच्या शिक्षकाची एका महिलेने सोन्याच्या गुंतवणुकीतून १० ते २० टक्के वाढीव नफा मिळवून देते, असे आमिष दाखवून शिक्षकाची ६६ लाख १० हजार रूपयांची गेल्या महिनाभराच्या कालावधीत फसवणूक केली आहे. या शिक्षकाने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. याप्रकरणात अद्याप कोणाला अटक करण्यात आली नाही, असे पोलिसांनी सांगितले. शिक्षकाने दाखल केलेल्या प्राथमिक तपासणी अहवालातील माहिती अशी, की गेल्या महिन्यात या शिक्षकाला एका महिलेकडून फेसबुक मित्र होण्याची विनंती करणारी जुळणी पाठविण्यात आली. या शिक्षकाने होकार दर्शवून मित्र होण्याची विनंती मान्य केली.

# लोणार तहसीलवर धडकली शेतकऱ्यांची कर्जमाफीची वारी

## २६ एप्रिल पर्यंत कर्जमाफी न केल्यास मुंबई नागपूर महामार्गावर बेमुदत रास्ता रोको करणार सहदेव लाड यांचा राज्य सरकारला गंभीर इशारा




दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महार चिकना :** शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी यासह इतर मागण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांच्या नेतृत्वात लोणार तहसील कार्यालयावर वारकऱ्यांच्या पारंपारिक वेशभूषेत टाळ मृदुंगाच्या गजरात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची वारी आंदोलन करण्यात आले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकी पूर्वी सरसकट कर्जमाफी चे आश्वासन दिले होते सरकार सत्तेत येऊन तीन महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप पर्यंत सरकारने कर्जमाफी न केल्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे तर दुसरीकडे राज्याचे काही मंत्री हे शेतकऱ्या विषयी बेताल वक्तव्य करत आहे त्यामुळे येत्या २६ एप्रिल पर्यंत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात योग्य निर्णय घेऊन कर्जमाफी न केल्यास लोणार तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई नागपूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी दिला आहे

# महाराष्ट्राचे वाळवंट करणार असे सरकारने जाहीर करावे



दैनिक आपला विदर्भ

**माजी मंत्री आदित्य ठाकरे यांची पत्रकार परिषदेत टिका**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे वाळवंट करणार असे सरकारने जाहीर करावे, म्हणजे आम्ही विचारणार नाही. पीक विमा कंपन्या नेमका कुणाचा फायदा करतात हे देखील पहावे लागेल. असे मत माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, मुंबईत आणि महाराष्ट्रात महत्वाचा विषय आहे. तो पाण्याचा मुंबईत अनेक इमारती चाळीमध्ये पाणी पोहोचण्याचे काम टँकर मार्फत केले जात आहे. मी आयुक्तांना पाणी प्रश्नावर बोलायला सांगितले होते.त्यांच्या मागण्या फार नाहीत. सरकारकडून फक्त प्रस्ताव मांडला जातो, तो राज्य सरकारकडून केंद्राकडे जातो की नाही? ते पाहावे लागेल.मुंबईत सहा महिन्यांपासून पाणी प्रश्न आहे. अनेक ठिकाणी दूषित पाणी येते. दुसरा विषय एसटीचा आहे.अनेक कोटींचे पैसे यांनी जमा केले. काही महिन्यांपूर्वी बीएमसी कर्मचाऱ्यांचा पगार आला नाही.एसटी कर्मचाऱ्यांना फक्त ५६ टक्के पगार आला. पुढील काही दिवसांत पगार द्यायला पैसे नसतील.

जेव्हा माविआचे सरकार असताना जे लोक एसटी कर्मचाऱ्यांना रस्त्यावर आणत होते ते आज कुठे दिसत नाही. सरकारला आम्ही इशारा देतो की आम्ही या प्रश्नावर रस्त्यावर येतो.अधिकारी लाँग वीकेंड म्हणून अनेक अधिकारी सुट्ट्यांवर गेले आहे. आम्ही प्रत्येक वॉर्ड अधिकाऱ्याला विचारू, साठ हजार झाडे कापली जाणार आहेत.महाराष्ट्राचे वाळवंट करणार असे सरकारने जाहीर करावे, म्हणजे आम्ही विचारणार नाही. पीक विमा कंपन्या नेमका कुणाचा फायदा करतात हे देखील पहावे लागेल. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी सरकारने अद्याप कोणतीही मदत दिलेली नाही. तहव्वूर राणाला काल आणलं आहे. आमचं स्पष्ट मत आहे की, त्याला भर चौकात फाशी दिली गेली पाहिजे. अशी आमची मागणी आहे अशी माहिती माध्यमांशी बोलताना ठाकरे यांनी दिली.

## 'एक दिवस उपाशी राहीन, पण सेक्स'; समंथाचं उत्तर ऐकून सगळे शॉक

**मुंबई/प्रतिनिधी :**दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री समांथा रूथ प्रभ आपल्या अभिनयासोबतच स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध आहे. तिच्या वैयक्तिक जीवनातही अनेक चढउतार पाहायला मिळाले आहेत. प्रसिद्ध अभिनेता नागार्जुन यांच्या घराण्यात सून म्हणून वावरताना आणि नागा चैतन्यसोबत वैवाहिक आयुष्य घालवताना तिने अनेक वेळा धाडसी मतं मांडली. असाच एक तिचा जुना मुलाखतीतील विधान सध्या पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनलं आहे. एका फोटोशूटदरम्यान पत्रकाराने समंथाला अत्यंत अनपेक्षित प्रश्न विचारला "तुला जर एकच गोष्ट निवडायची असेल, जेवण की सेक्स?" यावर उत्तर देताना समंथाने कोणताही आडपडदा न ठेवता म्हटलं, "मी एक दिवस उपाशी राहीन, पण अन्नाऐवजी मी सेक्सची निवड करीन." तिचं हे थेट आणि स्पष्ट उत्तर अनेकांसाठी धक्कादायक ठरलं. यानंतर सोशल मीडियावर प्रतिक्रियांचा भडीमार झाला. काहींनी तिच्या बोल्ड स्वभावाचं कौतुक केलं, तर काहींनी तिच्यावर जोरदार टीका केली. समांथाच्या या विधानावरून इंटरनेटवर गदारोळ उडाला. अनेकांनी तिला ट्रोल केलं, मात्र नेहमीप्रमाणेच समंथाने कोणत्याही नकारात्मक प्रतिक्रियांना भीक न घालता आपली भूमिका ठामपणे मांडली. ती नेहमीच सोशल मीडियावर सक्रिय असून, तिच्या पोस्ट्स, फोटोशूट्स आणि व्हिडीओजमुळे चाहत्यांमध्ये कायमच उत्सुकता असते.

# ओबीसींचे आरक्षण टिकले पाहिजे : माजी मंत्री छगन भुजबळ

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी :** ओबीसी आरक्षणाची केस सध्या सुप्रीम कोर्टात सुरू आहे.आम्ही स्वतः सुप्रीम कोर्टात केलेले वकील उभे केले आहेत.सुनावणी कधीही घ्या आम्हाला त्याच्याशी कर्तव्य नाही. आमचे ओबीसींचे आरक्षण टिकले पाहिजे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले.

आज पुणे येथे महात्मा फुले यांच्या वाड्यावर अभिवादन केले. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, माझ्यासोबत आमदार चंद्रकांत पाटील होते. सर्वच राजकीय आणि कामाचे मंडळी होते. आज आपण बघतोय मोठ्या उत्साहात नाशिक येथे मिरवणूक निघाली आहे.मी जे काही वाचल आहे, ते महात्मा फुले हे थॉमस स्पेन आणि इतर जे जगातील फिलॉसॉफर्स आहेत.त्याची पुस्तक वाचून फुलेंनी प्रेरणा घेतली. उदयनराजे तो ओ राजा है हम प्रजा है, हब उनके खिलाब कैसे बात करेगे भाई.पण मला एक माहिती आहे. पूर्वीचे राजवाडे आपल्या घरातील मुलांना शिकवण्यासाठी राजवाड्यामध्येच शिकण्याची व्यवस्था करत होते.

सार्वजनिक रित्या नाही.१८५१ साली सार्वजनिक शाळा ब्रिटिशांकडे सुपूर्त करण्यात आली. १९४८ यांनी पहिली शाळा महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी निर्माण केली. दिल्लीला मेळाव्याला जाणार आहे. सर्व देशातील ओबीसींचे प्रमुख नेते या मेळाव्याला येणार आहेत.मला आमंत्रित केले आहे.त्यामुळे मी जाणार आहे. ओबीसी आरक्षणाची केस सध्या सुप्रीम कोर्टात सुरू आहे. आम्ही स्वतः सुप्रीम कोर्टात केलेले वकील उभे केले आहेत.सुनावणी कधीही घ्या आम्हाला त्याच्याशी कर्तव्य नाही.आमचे ओबीसींचे आरक्षण टिकले पाहिजे,असे मत माजी मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले.

# गांधीनगर येथे दोन दिवसीय होमिओपॅथिक अधिवेशनाचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले उद्घाटन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी : भारतीय आरोग्यसेवात गुणवत्तापूर्वक उपचार पद्धतीत होमिओपॅथीची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे असे प्रतिपादन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.**

## गुणवत्तापूर्वक उपचार पद्धतीत होमिओपॅथीची भूमिका महत्त्वपूर्ण : केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव




जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त १० एप्रिलला गुजरात राज्यातील गांधीनगर येथे आयोजीत करण्यात आलेल्या होमिओपॅथी अधिवेशनाच उद्घाटन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते पुढे म्हणाले की होमीओपॅथी उपचार पद्धतीच्या माध्यमातून व्याधी दुरुस्त करण्याचं काम केल्या जात आहे ही उपचार पद्धती विश्वास पात्र ठरत असून कमी खर्चात लोकांना उपलब्ध होत असल्यामुळे लोकही कल ह्या उपचार पद्धतीकडे वाढला आहे आयुष विभागाअंतर्गत आरोग्याच्या दृष्टिकोनातून विविध उपाय योजना करण्यात येत आहे त्याचा फायदा संपूर्ण देशातील लोकांना होणार असल्याचेही केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी सांगितलं या उद्घाटन कार्यक्रमाला सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन होमिओपॅथी (सीसीआरएच) चे महासंचालक डॉ. सुभाष कौशिक ,राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे (एनसीएच) प्रभारी अध्यक्ष डॉ. पिनाकिन एन. त्रिवेदी राष्ट्रीय होमिओपॅथी संस्थेचे संचालक डॉ. प्रलय शर्मा उपस्थित होते आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत आयोजित दोन दिवसांचे अधिवेशन केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषद, राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग आणि राष्ट्रीय होमिओपॅथी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गांधीनगर येथील महात्मा मंदिर कन्व्हेन्शन अँड एक्झिबिशन सेंटर येथे होत आहे .या वर्षी, अधिवेशनाची थीम अध्ययन, अध्ययन आणि अनुसंधान आहे , जी होमिओपॅथीच्या विकासासाठी तीन पायाभूत स्तंभांवर प्रकाश टाकणार आहे.

या कार्यक्रमासाठी जगभरातून प्रतिनिधी सहभागी झाले आहेत होमिओपॅथीच्या इतिहासातील हा सर्वात मोठा मेळावा ठरला आहे. या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे भारतातील सर्वात मोठी ''लाइव्ह मटेरिया मेडिका'' स्पर्धा आणि तिन्ही सहयोगी संस्थांनी एकत्रितपणे व्यापक चर्चा करण्यासाठी स्वतंत्र, विचारप्रवर्तक सत्रे आयोजित केली आहेत. जामनगरमध्ये चे पहिले जागतिक पारंपारिक औषध केंद्र असल्याने, हा मोठ्या प्रमाणात होणारा कार्यक्रम पारंपारिक आणि पूरक औषध प्रणालींना मान्यता देणारा ठरणार आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे आज दि. १२ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी १२.३० वाजता पिंपळगांव देवी ता. मोताळा जि. बुलढाणा येथे भागवत सप्ताहास भेट, दुपारी १ वाजता कोल्ही गवळी ता. मोताळा जि. बुलढाणा येथे श्री महाबळेश्वर यात्रेनिमीत्त भेट. दुपारी १.४५ वाजता तपोवन ता. मोताळा जि. बुलढाणा येथे श्री. हनुमान जयंती कार्यक्रमानिमीत्त भेट. दुपारी २ वाजता जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथे जागतीक होमिओपॅथी डॉक्टर्स असोसिएशन यांनी आयोजीत होमिओपॅथी जनक सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंतीनिमीत्त कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता चिखली येथे श्री. रेणुका देवी यात्रेनिमीत्त भेट. त्यानंतर सोयीनुसार मातोश्री, शिवाजी नगर, मेहकरकडे प्रस्थान करतील.

## बुलढाणा येथील मॉडेलच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल

### उद्योगधंद्यांची विद्यार्थ्यांना देण्यात आली शालेय माहिती



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** वाणिज्य शाखेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेयदशेतच औद्योगिक क्षेत्रातील ज्ञान देण्याच्या दृष्टिकोनातून बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये वाणिज्य भाग ३ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची औद्योगिक सहलीचे आयोजन नुकतील आयोजीत करण्यात आली होती

बुलढाणा जिल्ह्याला लागूनच असलेल्या जळगाव येथील औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या गुरुदेव प्लास्टो चटई उद्योग समूहाला बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये वाणिज्य भाग ३ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भेट दिली विद्यार्थ्यांनी तेथील कामकाजाची पाहणी केली यावेळी उद्योजकांनी विद्यार्थ्यांना सुद्धा उद्योग समूहाबद्दल माहिती दिली उद्योग क्षेत्रामध्ये जिद्द चिकाटी आणि परिश्रम असल्यास उद्योग समूह भरभराटीला येतो असंच उद्योजकांनी या विद्यार्थ्यांच्या समोर कथन केला या सहलीच आयोजन बुलढाणा मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापिक समृद्धी गोडबोले वसुधा घुमरे दीपक ननयी अक्षय नरवाडे सुचिता माळोदे अर्चना गावंडे पाटील मनीषा राऊत यांनी केल होते विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राविषयी ज्ञान देण्याचं काम या सहलीच्या माध्यमातून केल्या गेले .या सहलीमध्ये मॉडेल डिग्री कॉलेज वाणिज्य भाग तीन मध्ये शिकणारे विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांचे अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती शासकीय विश्रामगृह येथे आज साजरी करण्यात आली. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समाजकल्याण सहायक आयुक्त भाऊराव चव्हाण, सहायक माहिती अधिकारी सतिश बगमारे, विधी अधिकारी ॲड राहुल झाभरे, समाज कल्याण निरिक्षक प्रदीप जाधव, समाजिक कार्यकर्त भैयासाहेब पाटील आदींनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## समाजातल्या कोणत्याच घटकाला न्याय देऊ शकत नसाल तर राज्यातल्या मंत्र्यांनी राजीनामे दिले पाहिजे - जयश्री शेळके



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी मोठ मोठ्या योजनांचा बोभाटा करून जनतेची मते मिळणाऱ्या महायुती सरकारला निवडणुकीनंतर मात्र समाजातल्या सगळ्याचं घटकांचा विसर पडलेला आहे. आधी लाडक्या बहिणींना सांगितले आम्ही २१०० रु. देऊ शकत नाही. नंतर शेतकरी बांधवांना सांगितले आम्ही कर्जमाफी देऊ शकत नाही. आता तर एसटी कर्मचाऱ्यांच्या पोटावर पाय मारण्याचं काम या सरकारने केलेलं आहे. एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचा पगार मिळालेला आहे तोही आता आणि तो सुद्धा ५६ टक्के. ४४ टक्के पगारामध्ये कपात करण्यात आलेली आहे. हे ४४ टक्के कधी मिळतील हेही सांगितलेलं नाही. अशा प्रकारे जर समाजातल्या कोणत्याच घटकाला जर तुम्ही न्याय देऊ शकत नसाल तर या राज्यातल्या मंत्र्यांनी राजीनामे दिले पाहिजेत.

## बुलढाणा वनविभागात दोन बिबट्यांचे मृतदेह आढळले

### विषप्रयोगाचा संशय, एक आरोपी ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा परिक्षेत्रातील गुम्मी वर्तुळ, गुम्मी नियतक्षेत्रातील वनखंडामध्ये दि. ९ एप्रिल रोजी दोन बिबट्यांचे मृतदेह आढळून आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याला विद्यमान प्रथम वर्ग न्यायालय, बुलढाणा येथे हजर केले असता एक दिवसाची वनकोठडी सुनावण्यात आली असल्याची माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, सदरील बिबट्यांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले असून त्यांचा मृत्यू अंदाजे १० ते १५ दिवसांपूर्वी झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. शवविच्छेदनानंतर बिबट्यांचे अवयव न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, बिबट्यांच्या मृत्यूमागे विषप्रयोगाचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. प्रकरणाचा सखोल तपास सहाय्यक वनसंरक्षक (प्रा व कॅम्पा) बुलढाणा तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बुलढाणा करत असून, वन्यजीव क्राईम सेल, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांच्याकडूनही तपासात मदत घेतली जात आहे.

बिबट्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे पुढील न्यायवैद्यक अहवालावरून स्पष्ट होणार असून वनविभागाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

## विविध वृत्त...

### सोमवारी (२१एप्रिल) महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने एप्रिल महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

### रविवारी ''जय भीम पदयात्रा''; उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंतीनिमित्य जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,एन.एस.एस, एन.सी.सी., एन.वाय.के.एस, भारत स्काऊटस ॲण्ड गाईड व माय भारत स्वयंसेवक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १३ एप्रिल २०२५ रोजी ''जय भीम'' पदयात्रेचे आयोजन सकाळी ७.०० वा. जिजामाता प्रेक्षागार येथून करण्यात आली आहे. सदर पदयात्रेला मान्यवरांच्या शुभहस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ होईल.

पदयात्रेचा मार्ग- जिजामाता प्रेक्षेगार -संगम चौक-जयस्तंभ चौक -एस.बी.आय. बॅक- जिजामाता प्रेक्षेगार येथे समारोप होईल. या पदयात्रेमध्ये शहरातील सर्व शैक्षणिक संस्थेमधील विद्यार्थी, शिक्षक व क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रेमी विविध खेळ संघटनांचे पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरीक व सर्व सन्मानीय अधिकारी, कर्मचारी वृंद यांनी मोठया संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

### महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात आज साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, सुरेश थोरात, नायब तहसीलदार प्रमोद खरे, रवींद्र लहाने, गजानन मोतेकर आदींनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### कृषि निविष्ठा सनियंत्रणासाठी जिल्हा व तालुकास्तरावर १४ भरारी पथक; तक्रारी नोंदविण्याचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खरीप हंगामाची सुरुवात झाली आहे. हंगामामध्ये शेतकऱ्यांना गुणवत्ता पुर्ण कृषी निविष्ठा, बियाणे, खते व किटकनाशके योग्य दराने उपलब्ध व्हावी तसेच कृषी निविष्ठेच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारी, जादा दराने, साठेबाजी व अनाधिकृत कृषी निविष्ठांची विक्री करणे, अशा प्रकारच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. असे प्रकार निर्देशनात आल्यास तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बुलढाणा यांनी केले आहे.

खरीप हंगाम २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रत्येक तालुक्यामध्ये १ व जिल्ह्यास्तरावर १ असे एकुण १४ भरारी पथक नेमण्यात आले आहे. या भरारी पथकांमार्फत तपासणी तसेच कारवाई करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना योग्य ती खते, बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्ह्यातील सन २०२४-२५ मध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये गुणनियंत्रण विषयक बियाणे नमुने-१३१२, खते-६१९, किटकनाशके-२३१ कृषि निविष्ठाचे नमुने काढून १२ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित केले आहेत. तर ११६ केंद्रांचे परवाने कायमस्वरुपी रद्द केले आहेत. तसेच बियाणे- १७४, खते-२८, किटकनाशके-१४ विक्री बंद आदेश देऊन संबंधीत कृषि सेवा केंद्रावर कारवाई करण्यात आलेली आहे.

सन २०२४-२५ मध्ये कंपनी विरूध्द बियाणे-५, खते-५, किटकनाशक- १ असे एकुण ११ विविध कंपन्यावर कोर्ट केस दाखल करण्यात आलेल्या आहेत. जिल्ह्यात २०२५ च्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाने शासनाकडे १,७२,७५० मे. टन खतांची मागणी केली आहे. कृषी विभागांतर्गत गुणवत्ता नियंत्रणासाठी भरारी पथकामार्फत दर माहिन्याला अचाणक तपासणी करण्यात येत आहे.